दैनिक जनसामान्यांचे शस्त्र
मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे



# श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, भगवान भक्तीगड, नारायणगडावर पंकजाताई मुंडे नतमस्तक

बीड (प्रतिनिधी);- बीड लोकसभेच्या उमेदवार तथा भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी काल व आज जिल्हयातील श्रध्देय गडांच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. जिल्हयातील जनतेच्या ऋणात नेहमी असावे, त्यांचेवरील प्रेम कधीही कमी होऊ नये अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. गड परिसरातील ग्रामस्थांनी देखील त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याचा शब्द यावेळी दिला.

लोकसभेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पंकजाताई मुंडे शुक्रवारी बीडमध्ये आल्या. धामणगांव इथं जल्लोषात स्वागत झाल्यानंतर काल रात्री त्यांनी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर जाऊन श्रध्देय वामनभाऊ, राष्ट्रसंत भगवान बाबा, कुसळंब येथील खंडेश्वर यांचे आशीर्वाद घेतले. आज सकाळी धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या श्रीक्षेत्र नारायणगडावर जावून त्यांनी संत नगद नारायण महाराजांचे आशीर्वाद घेतले. दोन्ही गडावर त्यांना महंत शिवाजी महाराज, विठ्ठल महाराज यांनी आशीर्वाद दिले.

**ग्रामस्थांनी दिला एकमुखी पाठिंब्याचा शब्द**

गहिनीनाथ गड, सावरगाव येथे पं ग्रामस्थांनी पंकजाताईंचे वाजतगाजत भव्य स्वागत केले. इथं त्यांची पेढेतुलाही करण्यात आली. यावेळी संवाद साधताना त्या म्हणाल्या, प्रथा, परंपरे प्रमाणे मी गडावर आले आहे, ही परंपरा मुंडे साहेबांपासून आहे. मला उमेदवारी जाहीर झाली, मुंडे साहेबांनी सांभाळेल्या सर्वांना सांभाळण्यासाठी लोकसभा लढवण्याचा मी निर्णय घेतला. मंत्री असताना सर्व गडांना निधी दिला, पुढेही जिल्हयाचा विकास करण्यासाठी जीवाचं रान करेल. तुमचं माझेवर खूप प्रेम आहे,हे कधीही कमी होऊ नये.अफवावर विश्वास ठेवू नका.माझे यश हे माझं नाही. तुमचं आहे. कारण तुमच्यासाठी मला काम करायचं आहे, त्यासाठी मला आशीर्वाद द्या असं पंकजाताई म्हणाल्या. यावेळी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, आ. सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.



# डोंगरकिन्ही येथील डॉ.सुशांत येवले यांचे बीएएमएस परिक्षेत यश संपादन



पाटोदा (प्रतिनिधी) : पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथिल डॉ सुशांत आण्णासाहेब येवले यांनी बीएएमएस परिक्षेत अंतिम वर्षात उत्तीर्ण होऊन यश संपादन केल्याने डोंगरकिन्ही परिसरात अभिनंदन होत आहे.

डोंगरकिन्ही येथिल रहिवासी व पंचायत समिती शिरुर कासार येथे कार्यरत असणारे अभियंता आण्णासाहेब येवले यांचा मुलगा डॉ सुशांत येवले यांनी यश संपादन केले आहे.सुशांत यांचे प्राथमिक शिक्षण जि प शाळा खडकडोह येथे तर माध्यमिक शिक्षण संस्कार विद्यालय बीड तर महाविद्यालयीन शिक्षण देवगिरी छत्रपती संभाजी नगर येथे झाले.बारावी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या मातोश्री आसराबाई दराडे आयुर्वेदिक महाविद्यालयात बीएएमएस चे शिक्षण घेतले.या परिक्षेत अंतिम वर्षात डॉ सुशांत यांनी उत्तीर्ण होऊन यश संपादन केल्याने डोंगरकिन्ही परिसरात सुशांत यांचे अभिनंदन होत आहे.

डॉ सुशांत यांचे माजी सरपंच आप्पासाहेब येवले, अनिलशेठ काथवटे, सरपंच आण्णासाहेब येवले, बाबुराव येवले माजी सभापती विक्रम म्हस्के, प्रविण सोनवणे सर, अशोकराव कोळपकर,संभाजी येवले, अरुणकाका येवले,संतोष कोळपकर, अशोक तु.येवले पत्रकार दयानंद सोनवणे, अरुण येवले, चेअरमन हनुमंत येवले,आर आर येवले,सह ग्रामस्थांनी व मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे.

# दिंदुड सरपंचाचा मनमानी कारभार

## दोन वर्षात सहा ते सात ग्रामसेवक बदलले

दिंदुड,(प्रतिनिधी):- अनेकवेळा सरकारी बाबूच्या बदलीसाठी आग्रह केला जातो. अधिकाऱ्याची अनुपस्थित, कामात अनियमितता यामुळे बदलीसाठी ग्रामस्थ आग्रही असतात पण माजलगाव तालुक्यातील दिंदुड येथील ग्रामस्थ ग्रामसेवकाची बदली रद्द करावी या मागणीसाठी एकवटले आहेत.दिंदुड ग्रामपंचायत ही १५ सदस्य ग्रामपंचायत आहे. १५ ते २० हजार लोकसंख्या असलेल्या या गावात ग्रामपंचायत अंतर्गत येणारी सर्व कामे रखडली आहे.रजिस्टर फेरफार,पी.टी. आर.,नाहरकत, रहिवासी प्रमाणपत्र,रोजगार हमी योजना कामे,मागील चार महिण्यापासून खोळंबली असून जिल्हा प्रशासनाचे दिंदुड ग्रामपंचायत कडे दुर्लक्ष आहे.सरपंच मनाला येईल तेच कारभार असा खेळ आहे.आणि त्याला प्रशासन साथ देत आहे. २ माहिण्यापूर्वी पोटभरे मॅडम ग्रामसेवक यांनी पदभार स्वीकारला.आता पर्यत सही नमुना दिला नाही.ग्रामपंचायत आर्थिक व्यवहार व गावचे विकासकामे कसे करणार असा सवाल उपस्थित होत आहे.दिंदुड ग्रामपंचायत

मध्ये सरपंच अजय कोमटेवार यांचा मनाला येईल तोच कारभार आहे.यात दिंदुड ग्रामस्थ वैतागले आहे.

गावच्या विकासकामात राजकारण करू नये अखिल सय्यद सरपंच करे सो कायदा अशी गत दिंदुड ग्रामपंचायत मध्ये झाली आहे.प्रत्येक महिन्याला ग्रामसेवक यांना टार्गेट करून कसं बदलता येईल ह्याकडे विदमान सरपंच यांचं लक्ष असत.तेवढ लक्ष गावच्या विकासासाठी दिल तर नक्की दिंदुडचा विकास होईल.ग्रामसेवक वारंवार बदलल्याने दिंदुडचा विकास कामांना खीळ बसली आहे.जिल्हा प्रशासन व बी डी ओ पारटकर,विस्तार अधिकारी थावरे यांनी दिंदुड ग्रामपंचायत कडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# रमाई आवास घरकुल योजनेचे थकीत अनुदान वाटप करावे

## सामाजिक कार्यकर्त्यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

बीड (प्रतिनिधी): बीड नगरपरिषद अंतर्गत असणाऱ्या रमाई आवास घरकुल योजनेचे थकीत असलेले अनुदान वाटप करण्यात यावे यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी नगरपरिषद कार्यालयामध्ये निवेदन दिले आहे. सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८,२०१८-१९, २०१९-२०,२०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षामध्ये लाभार्थ्यांना



बीड नगरपरिषद अंतर्गत रमाई घरकुल आवास योजनेचे मंजूर झालेले आहेत परंतु या लाभार्थ्यांना आजपर्यंत घरकुलाचे काहींना पहिला हप्ता व काहींना दुसरा हप्ता मिळालेला असून तिसरा हप्ता देणे बाकी आहे. वेळोवेळी निवेदन देऊनही नगरपरिषदे कडून चांगल्या प्रकारे करण्यात आली आहे. यामध्ये आचारसंहितेचा काही संबंध नसताना चारव्या कडून दुसरा व तिसरा हप्ता देण्याचा आचारसंहितेचे कारण सांगण्यात येत आहे. तरी निवेदनाची दखल घेण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून मुख्याधिकारी नीता अंधारे यांना करण्यात आली आहे. यावेळी प्रमोद शिंदे ,अमोल पौळ (माजी नगरसेवक) कपिल सोनवणे, अमोल अहिरे, लक्ष्मण गलांडे यांच्यासह सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# चव्हाण दाम्पत्याकडून आष्टीतील उजमाच्या आई सायरा शेख यांचा सत्कार



आष्टी (प्रतिनिधी):- आष्टीच्या उजमा शेख या युवतीने एमपीएससीच्या माध्यमातून पोलीस उपनिरीक्षक पदाची मजल मारली आहे. उजमाच्या या नेत्रदीप यशाचे कौतुक करण्यासाठी मुंबई येथील पोलीस उपअधीक्षक मंदा घोगरे/चव्हाण, समाजसेवक अँड.प्रदीप चव्हाण यांनी सहकाऱ्यां सोबत उजमा शेख यांच्या घरी सदिच्छा भेट देऊन उजमाच्या आईचा सत्कार केला. ● अल्पसंख्याक समाजातील उजमा सलीम शेख या युवतीने एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन करून पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली आहे. लहानपणी वडिलांचे छत्र हारपलेलं असताना आई सायरा शेख यांनी अथक परिश्रम करून ;उजमाचे शिक्षण पूर्ण करण्यावर भर दिला. उजमाने देखील आईच्या कष्टाचे चिज करत एमपीएससी परीक्षेत यश मिळवून पोलीस उपनिरीक्षक पद मिळवले आहे. उजमाच्या निवडीची बातमी कळताच नातेवाईक व मित्र परिवाराने मिठाई वाटप करून आनंद साजरा केला.

परिस्थितीशी दोन हात करून मिळवलेल्या यशाचे कौतुक करण्यासाठी मोठ्या मनाची गरज असते. चव्हाण दाम्पत्याने असंच मोठं मन करत मंगळवार दि १९ मार्च रोजी सायंकाळी शेख यांच्या आष्टी येथील राहत्या घरी सदिच्छा भेट दिली यावेळी उजमाच्या या यशामागे भक्कमपणे उभे असलेल्या आई सायरा शेख यांचा सत्कार करून उजमाच्या यशाचे तोंडभरून कौतुक देखील केले. यावेळी बोलताना डीवायएसपी सौ. चव्हाण यांनी सांगितले की, उजमाने ज्या परिस्थितीत हे यश मिळवले आहे. तशीच परिस्थिती १९९२ साली जेंव्हा संपूर्ण मराठवाड्यातुन एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन पोलीस दलात उपनिरीक्षक पदी निवड झालेली मी पहिली महिला होते. माझे वडील नसताना आईने वडिलांच्या भूमिकेत राहून मला या पदापर्यंत पोहचवण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. वडील नसल्याने घराची परिस्थिती काय असते याची मला जाण आहे. पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस उपअधीक्षक या प्रवासात अनेक आव्हानांना मी समोरे गेले आहे. भविष्यात उजमाला माझ्याकडून काहीही मदत लागल्यास मी त्यासाठी नक्कीच उभी राहीन असा विश्वास उजमाच्या आईला देत असताना सौ.चव्हाण यांचे डोळे भरून आले होते.

# ३१ मार्चनंतरही कांद्यावरील निर्यातबंदी कायम, सरकारचा मोठा निर्णय;शेतकरी संतप्त

मुंबई (प्रतिनिधी)) - कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक निराशाजनक बातमी समोर आली आहे. सध्या कांद्याच्या निर्यातीवर बंदी आहे. ही बंदी ३१ मार्चपर्यंत असल्याचं सरकारनं सांगितलं होतं. मात्र, आता ३१ मार्चनंतरही कांद्यावरील निर्यातबंदी कायम राहणार असल्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात शेतकऱ्यांसह विविध शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत. बोले तैसा न चाले अशाच प्रकारचं हे सरकार असल्याच्या भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

३१ मार्चनंतरही कांद्यावरील निर्यातबंदी कायम राहणार असल्याचे परित्रक सरकारच्या वतीन काढण्यात आलं आहे. पुढील आदेश निघपर्यंत कांद्यावरील निर्यातबंदी कायम राहणार असल्याचं सरकारच्या वतीनं सांगण्यात आलं आहे. केंद्र सरकारनं ३१ मार्चपर्यंत कांदा निर्यातबंदी केली होती. ती ३१ मार्चला उठेल अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, केंद्र सरकारनं पुढील आदेशापर्यंत कांदा निर्यातबंदी कायम ठेवली आहे. देशांतर्गत बाजारपेठेतील उपलब्धता आणि किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी निर्यातबंदीचा निर्णय घेतल्याचं केंद्राचं म्हणणं आहे.

# धनगर समाजातील वंचितांसाठी सदैव कटिबद्ध-भारत सोन्नर

## आरक्षणाचे काय ?गाव, वाड्या-वस्त्यांवर घुमू लागला आवाज



बीड, (प्रतिनिधी): धनगर समाजाच्या आरक्षण प्रश्नासाठी धनगर आरक्षण संवाद बैठकीत गाव वाड्या वस्त्यांवर धनगर आरक्षणाचे काय झाले? आस प्रश्न धनगर समाजातील लोकांनी गाव वाड्या वस्त्यावर विचारणा होत आहे धनगर आरक्षण जनजागृती संवाद बैठकीदरम्यान यशवंत सेना धनगर समाज नेते भारत सोन्नर यांनी बीड जिल्ह्यातील

# अनैतिक संबंधाच्या संशयातून बबन खरसाडेचा खुन न्यायालयाने ठोकली रामेश्वर झिटेला दंडासह जन्मठेप

बीड (प्रतिनिधी) - महिले सोबत अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून गेवराई तालुक्यातील तळणेवाडी येथील बबन ज्ञानोबा खरसाडे याच्यावर त्याच्या शेतात जावून धारदार शस्त्राचे वार करून खून केला तर मयतास वाचवण्यास आलेल्या त्याच्या भाच्याला जिवे मारण्याची धमकी दिली असा गुन्हा सिध्द झाल्यावरून जिल्हा व सत्र न्यायाधीश १ बीड एस.आर.पाटील मॅडम यांच्या कोर्टाने तळणषवाडी येथील रामेश्वर उर्फ लालू अण्णा झिटे यास दोषी ठरवत जन्मठेपेसह दहा हजार रूपये दंड व दंड न भरल्यास सहा महिन्याचा सश्रम कारावास तसेच साक्षीदारास धमकावल्या प्रकरणी दोन वर्षांची शिक्षा व एक हजार रूपये दंड, दंड न भरल्यास दोन महिन्याचा सश्रम कारावास अशी शिक्षा २२ मार्च २०२४ रोजी सुनावली या खटल्याची माहिती अशी की यातील फिर्यादीचा पती बबन खरसाडे याने आरोपी रामेश्वर अण्णा झिटे याची बटाईने जमीन करण्यास घेतली होती. तसे यातील आरोपीच्या नातेवाईकमहिलेचा व मयत बबन खरसाडे याचा अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून फिर्यादीच्या घरी जावून फिर्यादीचा पती बबन खरसाडे याला जिवे मारण्याची धमकी दिली होती. दरम्यान बबन खरसाडे हा १४ एप्रिल २०२२ च्या सायंकाळी त्याच्या तळणषवाडी येथील शेतात बाजरीच्या पिकाला पाणी देत असतांना रामेश्वर झिटे त्याच्याजवळ गेला व बबन खरसाडे याच्या अंगावर धारदार चाकूने वार केले. यावेळी बबन खरसाडे याचा भाच्चा सोपान तिथे आले असता त्याला देखील तु इथे आला तर जिवे मारून टाकील अशी धमकी दिली. तसे आरोपी निघुन गेला. मयत बबन खरसाडेची पत्नी हिने दिलेल्या फिर्यादीवरून रामेश्वर अण्णा झिटे याच्याविरूध्द गेवराई पोलीस ठाण्यात कलम ३०२,५०६ भांदवी प्रमाणे गुन्हा दाखल झाला. दरम्यान बबन खरसाडे याचा खुन केल्यानंतर आरोपीने घरी जावून स्वत:च्या पत्नीला देखील मारहाण केली. यामुळे ३०७ दाखल झाला होता तर आरोपी स्वत:हुन नगर जिल्ह्यातील शेवगाव पोलीस ठाण्यात हजर होवून त्याने गुन्ह्याची माहिती दिली होती. या गुन्ह्याचा तपाव गेवराई ठाण्याचे तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक टी.आर.बोडखे यांनी करून आरोपपत्र न्यायालयात सादर केले होते. सदर प्रकरणाची सुनावणी अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश १ एस.आर.पाटील मॅडम यांच्यासमोर झाली. यावेळी सरकार पक्षातर्फे १६ साक्षीदार तपासण्यात आले. यात फिर्यादीचा जबाब, साक्षीदारांचे साक्ष, परिस्थितीजन्य पुरावे, वैद्यकीय पुरावा याचे अवलोकन करून तसे जिल्हा सरकारी वकील अॅड.अजय दी.राख यांचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायाधीश एस.आर.पाटील मॅडम यांनी आरोप सिध्द झाल्याने रामेश्वर अण्णा झिटे रा.तळणषवाडी यास वरील प्रमाणे शिक्षा ठोठावली. न्यायालयाची बाजू जिल्हा सरकारी वकील अॅड.अजय दी.राख यांनी मांडली.

## राजस्थानी माध्यमिक विद्यालय सहयोग नगर शाळेत बक्षीस वितरण समारंभ संपन्न

बीड (प्रतिनिधी)- राजस्थानी माध्यमिक विद्यालय सह्योग नगर शाळेमध्ये शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी अनेक स्पर्धाचे आयोजन केले जाते.त्या स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांसाठी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजस्थानी सेवा समाज संस्थेचे अध्यक्ष श्री विष्णुदासजी तापडिया साहेब अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून बीड शहरातील उद्योजक अनिल जी चरखा साहेब व राजस्थानी सेवा समाज संस्थेचे सचिव रामेश्वर जी कासट साहेब व राजस्थानी सेवा संस्थेचे पदाधिकारी श्रीगंगाबिषण जी करवा साहेब व किशोरजी बाहेती साहेब उपस्थित होते.

दैनिक संभाजीनगर,बीड,जालना,परभणी,लातूर,धाराशिव जनसामान्यांचे शस्त्र

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

रविवार, दि. २४ मार्च २०२४ पान 6

अंक वाटपासाठी मुले पाहिजेत

दैनिक मराठवाडा पत्रचे अंक वाटपासाठी मुले पाहिजेत. गरजुंनी प्रत्यक्ष भेटावे.

-------:: पत्ता ::--------

दैनिक मराठवाडा पत्र कार्यालय ,सहयोगनगर जालना रोड, बीड.

मो.: 9822152955

# अटल सौर कृषी पंप योजना मधील सौर पंप खराब निघाल्याने नुकसान भरपाई देण्याचे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग बीड यांचा आदेश

बीड : मौजे आनंदगाव तालुका शिरूर येथील शेतकरी तक्रारदार नानाभाऊ धर्मा काळे यांनी गट क्र २०९ मध्ये ऑफलाईन पद्धतीने शासनाकडे अर्ज करून सोडत पद्धतीने ५ एच पी चा पंप व सोलार पॅनल सहित किंमत रक्कम रुपये २,४०,४९०/- (दोन लाख चाळीस हजार चारशे नव्वद ) अशी आहे त्या मध्ये तक्रारदार शेतकरी यांनी स्वतच्या हिश्याची १२०२५/-(बारा हजार पंचीवीस ) दिनांक.२१/०२/२०१९ रोजी भरले आणि रवी चंद्रन सगुणा पंप्स ॲण्ड मोटर्स कोईम्बतूर यांच्या कडून खरेदी केला होता. त्याला संमती महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण विभागीय कार्यालय लातूर यांनी दिली होती. तसेच सदरील संच याची ५ वर्ष देखभाल करणे हि कंपनीची जबादारी होती पण सदरील पंपात सन २०२१ मध्ये बिघाड झाला कंपनीला तक्रार करूनही काहीही फरक पडला नाही. सदरील पंप दुरुस्त करून देण्याची तजवीज सुद्धा दाखवली नाही मग तक्रारदार याने कंपनीला कायदेशीर नोटीस देऊनही त्या नोटीसला काहीही प्रतिसाद दिला नाही. त्यामूळे तक्रारदार याने वकिलां मार्फत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग बीड यांच्या कडे तक्रार क्र ८०/२०२३ दाखल केली. झालेल्या सुनावणीत तक्रारदार यांची बाजू ऐकून घेऊन सामनेवाले महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण विभागीय कार्यालय लातूर व रवी चंद्रन सगुणा पंप्स ॲण्ड मोटर्स कोईम्बतूर यांना मा.आयोग यांनी नोटिस देऊनही ते हजर झाले नाहित. त्यामुळे यांच्या वतीने एकतर्फा निकाल दिला. सदर निकालात मा.आयोग यांनी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण विभागीय कार्यालय लातूर व रवी चंद्रन सगुणा पंप्स ॲण्ड मोटर्स कोईम्बतूर यांना आदेशीत केले की तक्रारदार यास दिलेला सोलर पंप संच हा आदेश तारखे पासून ४५ दिवसात दुरुस्त करून देण्यात यावा, अथवा नवीन सोलार पंप देण्यात यावा अथवा, त्या पंपाची किंमत रक्कम रुपये २,४०,४९०/- (दोन लाख चाळीस हजार चारशे नव्वद) हि देण्यात यावी. तसेच मुदतीत रक्कम न दिल्यास दसादशे १२ टक्के व्याज द्यावे.

तसेच तक्रारदार यास नुकसान भरपाई पोटी रक्कम रु. २०,०००/- हजार रुपये,तसेच खर्चा पोटी २०,०००/- हजार रुपये ४५ दिवसात देण्यात यावेत.अन्यथा रक्कम जमा करे पर्यंत ८ टक्के व्याज देण्यात यावे असे आदेश दिले. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग बीड चे अध्यक्ष श्री हरीश गो.अडके, सदस्या श्रीमती सतिका ग.शिरदे यांनी दिनांक .१६/०२/२०२४ रोजी महावितरण कंपनीला दिले आहेत. शेतकऱ्यांच्या वतीने ड.एन.के.देशमुख. यांनी बाजू माडली व त्यांना ड.एस.आर.कुंभार,ड.व्ही.सी.मिसाळ, ड.एन.के.सिरसट यांनी सहकार्य केले आहे.

# देवाच्या नाही तर शेतकऱ्याच्या नावाचा एकमेव कीर्तन महोत्सव

परळी (प्रतिनिधी);- देवाच्या नावाने चालणारे अनेक कीर्तन महोत्सव पाहिले, परंतु शेतक-यांच्या नावाने सुरू असलेला हा एकमेव कीर्तन महोत्सव आहे, असा सूर शेतकरी कीर्तन महोत्सवात आलेल्या सर्व वक्त्यांच्या बोलण्यातून व्यक्त झाला. ख-या अर्थाने सामाजिक परिवर्तनाची ही सुरूवात म्हणता येईल, असे मतही अनेक वक्त्यांनी व्यक्त केले.

शेतकरी केंद्र स्थानी ठेऊन २१ गावातील लोकांच्या सहकार्यातून सुरू केलेल्या कीर्तन महोत्सवाचा दुसरा दवस विविध उपक्रमाने संपन्न झाला. सकाळी प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हमीद दाभोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबिर संपन्न झाले. या शिबिरात बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांची टीमही सहभागी झाली होती.



सुविधा वाढल्या,समाधान हरवले - डॉ. हमीद दाभोळकरजग वेगाने बदलत आहे. विज्ञानाच्या प्रगतीने अनेक सुविधा वाढल्या आहेत. सुविधा वाढल्या असल्या तरी माणूस समाधानी झाला नाही उलट तो अधिक तणावात गेला आहे. विशेषतः १५ ते ३५ वयोगटातील तरुणांचे मानसिक स्वास्थ्य मोठ्या प्रमाणात बिडताना दिसत आहे. त्यातून आपल्या देशात वर्षाला ऐकूण दोन लाख आत्महत्या होत आहेत. त्यात तरुणांचे प्रमाण अर्ध्याहून अधिक असल्याचे त्यांनी सांगितले. इतर रोगावर ज्या तातडीने उपचार घेतले जातात तितके मानसिक आजारावर घेतले जात नसल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. शेतकरी कीर्तन महोत्सवातून वैचारिक प्रबोधनाबरोबर शेतक-यांच्या आरोग्याची काळजी घेत असल्याबद्दल डॉ. दाभोळकर यांनी समाधान व्यक्त केले.गुरुदेव संप्रदायाच्या भजनाने शेतकरी श्रोते मंत्रमुगध शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या दुस-या दिवशीच्या संध्याकाळच्या सत्रात तुकडोजी महाराजांची भजने आणि ग्रामगीतेवर ज्ञानेश्वर दादा रक्षक आणि रवी मानव यांची प्रवचने झाली. गुरूदेव संप्रदायाच्या वतीने केलेल्या सादरीकरणात मोजरी येथील तुकडोजी महाराज गुरूकुलातील विद्यार्थ्यांनी भजने गायली. सहावी ते आठवीच्या वर्गात शिकणा-या या मुलांच्या भजनानी श्रोते मंत्रमुग्ध झाले. रवी मानव आणि ज्ञानेश्वर दादा रक्षक यांनी ग्रामगीतेतील पर्यावरण रक्षण, अंधश्रद्धा निर्मुलन, मुलींचे शिक्षण यावर उत्तम प्रबोधन केले.

### महिलांचा सन्मान ही संतांची शिकवण- विजय महाराज गवळी

जगद्गुरु तुकाराम महाराज यांना बदनाम करण्यासाठी देशात व्यवसाय करणा-या स्त्रीला त्यांच्याकडे पाठविले जाते. पण महाराज किंचितही विचलित होत नाहीत, उलट तिला - जाई ओ तू माय न करी सायासआम्ही विष्णूदास तैसे नहो असे बोलून तिला परत पाठवतात. हीच शिकवण शिवाजी महाराज यांना तुकाराम महाराज यांच्याकडून मिळाली. म्हणून नजराना म्हणून आणलेल्या कल्याणच्या शुभेदा-याच्या सेनेची शिवाजी महाराज यांनी बोळवण करून परत पाठवली केली. यातून इंद्रिय निग्रह आणि स्त्रियांच्या सन्मानाची संतांची भूमिका स्पष्ट होते, असे रात्रीच्या कीर्तनात विजय महाराज गवळी म्हणाले.

# आस्मानराव गायके यांचे अन्नत्याग आमरण उपोषण


गेवराई (प्रतिनिधी) जिल्हा अधिकारी कार्यालय बीड यांना वारंवार विनंती अर्ज व शासकीय पुरावे सादर करून १० टक्के डी.एम.एफ निधी रक्कम व आयकर विभागाचा बुडविलेला २ टक्के टी. सी.एस टॅक्स वसुल करण्यास १४ महिन्यापासुन टाळाटाळ करत असल्यामुळे आस्मानराव रामराव गायके हे दि. १८ पासुन मौजे संगमजळगाव ता. गेवराई, येथील हनुमान मंदिराच्या पायऱ्यावर बेमुदत अन्नत्याग आमरण उपोषणाला बसलेले असुन देखील प्रशासन सदर तक्रारीची व उपोषणाची दखल घेत नसल्याचे दिसुन येत आहे.



सविस्तर असे की कार्यकारी अभियंता बीड, व अधिक्षक अभियंता छत्रपती संभाजीनगर व कंत्राटदार महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड यांनी सन २०१६ ते २०२३ या कार्यकाळात केलेल्या रस्त्यासंदर्भात शासनास जमा केलेल्या अपर रॉयल्टी रक्कमेवर जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत गौण खनिजाचे स्वामित्व धनाचे १० टक्के निधी रक्कम व आयकर विभागाचा २ टक्के ठी सी. एस टॅक्स चलन एम.टी. आर फॉर्म नं. ६ सोबत गेवराई तहसिल व इतर कार्यालयात जाणीवपुर्वक जमा केलेला नाही. या बाबत आस्मानराव गायके यांनी जिल्हा अधिकारी कार्यालय बीड गेवराई तहसिलदार यांना १० टक्के डी.एम.एफ व २ टक्के टी.सी.एस वसुल करण्याबाबत वारंवार विनंती अर्ज व शासकीय पुरावे सादर करून डी.एम.एफ व टी.सी.एस जाणीवपूर्वक वसुल केला जात नाही. त्यामुळे आस्मानराव गायके हे शासनाच्या हितासाठी दि. १८ पासुन मौजे संगमजळगाव ता. गेवराई, जि.बीड येथील हनुमान मंदिराच्या पायऱ्यावर बेमुदत अन्नत्याग आमरण उपोषणाला करत आहे .सदर उपोषणाची तात्काळ चौकशी करून जिल्हा अधिकारी कार्यालयाचा हक्काचा १० टक्के डी.एम.एफ निधी व आयकर विभागाचा बुडविलेला २ टक्के टी. सी.एस व्याज्यासह व दंडासह वसुल करून दोषीवर कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल करावे असे उपोषण करते आस्मानराव गायके यांनी पत्राद्वारे अशी मागणी केली आहे.

# कत्तलीच्या उद्देशाने गाईंना घेवुन जाणारा टेम्पो पोलिसांनी पकडला

केज(प्रतिनिधी):- कत्तलीच्या उद्देशाने अवैध वाहतूक करीत गाईंना घेवून जाणाऱ्या टेम्पो मालकाला १,२७,१०० रू खावटी देण्याचा आदेश जय गौमाता जय श्रीराम केज पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीमध्ये २० मुक्या जीवांना आईशेर टेम्पो मध्ये दाटीवाटीने कत्तलिसाठी नेहण्याच्या उद्देशाने भरले होते यात १४ लहान वासरे व ६ मोठे गाई बैल भरून जात असताना पकडले , त्यांनतर गुन्हा नोंद करून सदर पशुधन गोशाळेत पुढील आदेशापर्यंत सोडण्यात आले . केज न्यायालयात टेंपो मिळावा म्हणून टेम्पो मालकांनी अर्ज दाखल केला असता मा न्यायालयांनी टेम्पो मालकास जप्त पशुधनाच्या संगोपन, संवर्धन खर्च हा १,२७,१०० रु देण्याचा आदेश केला. अन्यथा सबब खर्च लोकल अर्थॉरिटी ऑफ अरियरास ऑफ लैंड रेवेनिव्यू प्रमाणे वसूल करण्यात येईल.तसेच सबब खर्च जोपर्यंत जमा नाही केला जात तोपर्यंत टेम्पो हा पोलिसांकडे जमा राहील असा आदेश केला असून यात सरकार पक्षातर्फे ॲड देशपांडे व गोशाळेच्या वतीने ॲड अशोक मुंडे यांनी काम पाहिले



# केंद्र शासनाकडून 'सिमी' बेकायदेशीर संघटना घोषित

## बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंधक) न्यायाधिकरणाकडून 'सिमी'ला नोटीस

बीड, (प्रतिनिधी) केंद्र शासनाने २९ जानेवारी २०२४ काढलेल्या एस.ओ. ३५४ (इ) या अधिसूचनेनुसार स्टुडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) या संघटनेला बेकायदेशीर संघटना म्हणून घोषित केले आहे. बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम १९६७ कायद्याच्या कलम ३ च्या उप कलम (१) द्वारे ही कारवाई करण्यात आली आहे. याबाबत बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंधक) न्यायाधिकरण समोर सुनावणी सुरु असून २९ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये 'सिमी' संघटनेला बेकायदेशीर संघटना का घोषित केले जावू नये, याबाबत सिमी संघटनेला कारणे दाखवा नोटीस बजाविण्याचे आदेश न्यायाधिकरणाने दिले आहेत.

'सिमी' संघटनेच्या कार्यालयाला अधिसूचनेची प्रत लावणे, शक्य असेल तिथे पदाधिकाऱ्यांना नोटीस देणे, नोंदणीकृत पोस्ट अथवा स्पीड पोस्ट अथवा कुरियरद्वारे देखील नोटीस पाठविणे, संघटनेचे कार्यक्षेत्र असलेल्या भागात लाऊडस्पीकरद्वारे घोषणा करणे, रेडिओ, दूरदर्शनवर घोषणा करणे, प्रसारमाध्यमातून नोटीस प्रसिद्ध करण्याची कार्यवाही करण्याचे न्यायाधिकरणाने आदेशित केले आहे. या अनुषंगाने न्यायाधिकरणाची पुढील सुनावणी ९ एप्रिल २०२४ रोजी कोर्ट रूम नं. १६, दिल्ली हायकोर्ट, शेर खान रोड, नवी दिल्ली येथे होणार आहे.

# शहिद दिनानिमित्त एआयएसएफचे व्याख्यान संपन्न

बीड (प्रतिनिधि) : भारताच्या स्वातंत्र्यासाठी २३ मार्च १९३१ रोजी फासावर गेलेल्या शहीदे आझम भगतसिंग सुखदेव राजगुरु यांना ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (एआयएसएफ) या विद्यार्थी संघटनेच्या आणि ऑल इंडिया युथ फेडरेशन (एआयवायएफ) या युवक संघटनेच्या वतीने बीड शहरातील बशीरगंज चौकात अभिवादन करण्यात आले आणि संघटनेच्या कार्यालयावर शहीद भगतसिंगांचे विचार आणि सद्य सामाजिक - राजकीय परिस्थिती या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.



सविस्तर वृत्त असे की, २३ मार्च १९३१ रोजी देशाच्या स्वातंत्र्यासाठी हसत हसत फासावर जाणारे भगतसिंग, सुखदेव राजगुरु यांना आयडॉल मानणाऱ्या ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन आणि ऑल इंडिया युथ फेडरेशन या विद्यार्थी - युवक संघटना स्थापनेपासूनच भगतसिंगांच्या स्वप्नातील शोषणरहित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी भगतसिंगांच्या विचारांना घेऊन शोषण, अन्याय-अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करत आहेत. शहीद भगतसिंगांचे विचार विद्यार्थी युवकांना समजले पाहिजेत यासाठी वेळोवेळी संघटनेच्या वतीने अभ्यासवर्ग, व्याख्यान आणि शिबीराचे आयोजन केले जाते. आज शहीद दिनी भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांना संघटनेच्या वतीने बीड शहरातील बशीरगंज चौकात भगसिंग, सुखदेव राजगुरु यांच्या प्रतिमेला घालून अभिवादन करण्यात आले. तसेच अभिवादन झाल्यानंतर संघटनेच्या कार्यालयावर शहीद भगतसिंगाचे विचार आणि सद्य सामाजिक आणि राजकीय परिस्थिती या विषयावर ड. भीमराव चव्हाण यांचे व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यान कार्यक्रमासाठी शिक्षक नेते कॉ. डी जी तांदळे, कॉ. राजकुमार कदम, विनोद सवासे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. भाऊराव प्रभाळे, ॲड. अंबादास आगे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॉ. भाऊराव प्रभाळे यांनी तर कॉ. राजकुमार कदम यांनी शहीद भगतसिंग यांच्या विचारला उजाळा दिला. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप कॉ. डी जी तांदळे यांनी केला आणि आभारप्रदर्शन एआयवायएफचे कॉ. नितीन रांजवन यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कॉ. रामहरी मोरे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय इंगोले, विनायक जगताप, विकास जगताप, योगेश वाघमारे, कृष्णा जगताप, रोहित चव्हाण, विवेक जगताप, अझहर शेख, सचिन केकान, रविंद्र बर्डे, सुधीर आपरे आदींनी परिश्रम घेतले.

# डोंगरकिन्ही येथे धार्मिक सौहार्द, वामणभाऊ मंदिर प्रतिष्ठाणच्या वतीने मस्जीदमध्ये इफ्तार दावत संपन्न

पाटोदा (प्रतिनिधी) : पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी धार्मिक सौहार्द जपले असुन श्री संत वामणभाऊ मंदिर प्रतिष्ठाण च्या वतीने रोजा इफ्तार पार्टी संपन्न झाली.

डोंगरकिन्ही येथे सर्व जाती धर्माच्या पलीकडे जाऊन सौहार्दाचे वातावरण आसते.ते प्रत्येक धर्मियांच्या उत्सव व कार्यात पहावयास मिळते.सर्व जाती धर्माच्या सुख आणि दुःखाच्या कार्यक्रमात येथिल लहान थोर कुटुंबातील कार्यक्रमाप्रमाणे सहभागी होतात.येथे वास्तव्यास असलेला मुस्लीम समाज हा अल्पसंख्यांक आहे.येथिल हनुमान मंदीर तसेच मर्कज मज्जिद शेजारी शेजारी आहे.तर मज्जिद समोरच कब्रस्तान आहे.तर कब्रस्तानासमोरच मुस्लीम वस्ती आहे.ही या गावाची अख्यायिका.डोंगरकिन्ही यांच्या येथिल वामणभाऊ मंदिर प्रतिष्ठाण च्या सप्ताह काळात येथिल मुस्लिम समाज आपले मांसविक्रीचे सर्व दुकाने बंद ठेऊन सौहार्द पाळतात.पवित्र रमजान ईद उत्साहात साजरा होत असताना.मुस्लिम रोजदारा साठी वामणभाऊ मंदिर प्रतिष्ठाणच्या वतीने रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन मर्कज मज्जिद मध्ये करण्यात आले होते.वामणभाऊ मंदिर प्रतिष्ठाण चे अध्यक्ष तथा चेअरमन हनुमंत येवले व सर्व विश्वस्त मंडळानी केलेल्या आवाहनाला साद देत नईम (मुन्ना)शेख, बाबा फिटर, इरशाद पठान , शहाबाज शेख ,वसीम पठान, शिराज शेख ,असीम सय्यद, वाजेद शेख ,मुनीर पठान ,रफीक शेख ,अरशन शेख, साजेद्द पठान, असलम सय्यद ,अजर शेख, रशीद शेख ,या मुस्लिम बांधवांसह ग्रामपंचायत सदस्य संभाजी येवले, सचिव वसुआबा येवले , आप्पासाहेब मळेकर,संचालक गोकुळ येवले,शरद येवले सर,अनिल येवले सावकार, परमेश्वर सातपुते,अमोल येवले, आप्पासाहेब कोल्हे,अरुण येवले दादा शिंदे, किशोर येवले सह इफ्तार पार्टीत सर्व मुस्लिम रोजदार व गावातुन प्रतिष्ठित नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

